# जाहीर सूचना

## जुन्या इमारतींचे संरक्षणात्मक परिनिरिक्षण करणेसाठी बांधकाम अभियंते नोंदणीकृत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन राजपत्र १४ जानेवारी २००९आणि महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना दि. ८/७/२०११ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६५ मध्ये सुधारणा करण्याबाबत अध्यादेश पारित केले आहेत. मुंबई प्रांतिक म. म.न.पा. अधिनियम १९४५ चे २६५ (अ) च्या कलमानुंसार जुन्या इमारतींची अथवा मिळकती रहाण्यासाठी योग्य आहेत किंवा नाही या बाबत बांधकाम अभियंत्यांकडून तपासणी करून बांधकाम मजबुतीचा दाखला म्हणजेच स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी रिपोर्ट (संरक्षणात्मक परिनिरिक्षण) दाखल करणेची कार्यवाही बाबत तरतूद करणेत आलेली आहे.

उपरोक्त अधिसूचनेनुसार पुणे म.न.पा. च्या हद्दीतील इमारतींचे संरक्षणात्मक परिनिरिक्षण अनिवार्य करणेबाबत मुंबई प्रांतिक म.न.पा अधिनियम १९४९ चे कलम २६५ (अ) नुसार अंमलबजावणी करणेसाठी तसेच जून्या इमारतींचे रचनात्मक स्थैर्य प्राप्त करणेसाठी पुणे महानगरपालिका. मुख्य सभा ठराव क्र. ५८३ दि. २८/२/११ अन्वये मान्यता झालेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार पुणे म.न.पा हद्दीतील ज्या इमारतींचे बांधकाम ३० वर्षापूर्वीची आहेत, अशा सर्व इमारतीचे मालक, वापरदार व भोगवटादार यांना इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य करण्यात आले आहे. असे प्रमाणपत्र देणेसाठी बांधकाम अभियंता यांना पुणे म.न.पा. चा परवाना असणे आवश्यक आहे. त्या करीता खालील प्रमाणे पात्रता असलेल्या बांधकाम अभियंता यांनी पुणे महानगरपालिकेचा परवाना प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. त्याकरिता बांधकाम अभियंता यांनी पुणे महानगरपालिके कडे आवश्यक ती कागदपत्रे जोडून अर्ज केल्यास संबंधितांना रू. १०००/-ना परतावा शुल्क आकारून तीन वर्षासाठी परवाना देता येईल. व नूतणीकरणसाठी फी रू. २५०/- प्रति वार्षिक भरावे लागतील याबाबत आवश्यक कागदपत्रांची माहिती पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर व अति.नगर अभियंता ( बांधकाम विकास विभाग) कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच सदर सूचनेबाबत ठळक बाबी पुढील प्रमाणे आहेत.

१) बांधकाम अभियंता यांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्या पात्रतेसंबंधी तपासणी करताना गुणात्मक विचार करून अर्हतेबद्दल निश्चित निर्णय घेण्याचा अथवा त्यामध्ये बदल करणेचा अथवा पात्रता ग्रहण असतानाही प्रत्यक्ष चौकशी अंती एखादा अर्ज अपात्र करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना राहील.

२) स्ट्रक्चरल ऑडिटसाठी आकारावयाची फी संबंधित व्यक्ती यांनी इमारतीच्या मालकाकडून परस्पर वसूल करावी. या कामासाठीचे फी चे निकष आणि प्रमाणे तसेच त्यासंबंधीचे निर्माण होणारे कोणतेही वादविवाद यांचा पुणे म.न.पा शी कोणताही संबंध राहणार नाही.

३) उपरोक्त अधिनियमाच्या कलम २६५ (अ)मधील तरतुदीनुसार इमारत बांधकामदृष्टया सुस्थितीत आहे किंवा नाही? याबाबत बांधकाम अभियंताकडून करण्यात येणाऱ्या परिनिरिक्षणात इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधकाम सुस्थितीचे तपासणी करून अविघातक चाचणी बरोबरच इतर चाचण्या व त्यासंबंधीच्या अभिलेखाची तपासणी करण्याचा समावेश आवश्यक आहे.

४) बांधकाम अभियंत्याच्या नोंदणीसाठी अहर्ता आणि पात्रता निकष अधिनियमाच्या कलम २६५ अ अन्वये खालील प्रमाणे असणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधितांनी अति. नगर अभियंता कार्यालय (बांधकाम विकास) येथे आवश्यक कागदपत्रांसह लेखी अर्ज सदरची सूचना प्रसिध्द झाले पासून १ महिन्यात सादर करावी.

(क) कोणत्याही मान्यता प्राप्त भारतीय किंवा विदेशी विद्यापिठामधील स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा सनदी अभियंता किंवा भारतीय अभियांत्रिकी संस्थेच्या समतुल्य विदेशी संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभगातील सहयोगी सदस्य

**आणि**

(ख) संकल्पचित्र काढण्याचा व क्षेत्र कामे करण्याचा बांधकाम अभियंता व्यवसायामधील किमान ३ वर्षाचा अनुभव परंतु असे की, पोट- कलम (ख)मध्ये करारनिर्दिष्ट केलेला ३ वर्षाच्या अनुभवाचा निकष-

(१)बांधकाम अभियंता या शाखेतील कोणल्याही मान्यताप्राप्त भारतीय विद्यापिठाची किंवा विदेशी विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या व्यक्तिच्या बाबतीत २ वर्षे आणि

(२)बांधकाम अभियंता या विषयातील डॉक्टरेट धारण करणाऱ्या व्यक्तिबाबत, एक वर्षापर्यत शिथिल करण्यात येईल.

वरील पुर्व पात्रते प्रमाणे बांधकाम अभियंत्याची नोंदणी यादी (सूची) तयार करणेत येईल. कुठलाही अर्ज स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा हक्क महापालिका आयुक्तांकडे राहील.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.